**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी**
**<u>योजने अंतर्गत विहिरींची कामे घेण्याबाबत</u>**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्र.मग्रारो २०११/प्रक्र.२४/रोहयो-१०-अ**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : १० मार्च, २०११.**

**<u>वाचा:</u> १) शासन निर्णय नियोजन विभाग क्र.मग्रारोहयो २००६/प्र.क्र.१०४/रोहयो-१०, दि.१९/१०/२००६.**
**२) शासन निर्णय नियोजन विभाग क्र.रोहयो २००७/प्र.क्र.१७९/रोहयो-१, दि.१०/४/२००८ व शुध्दिपत्रक दि. २७/५/२००८**
**३) शासन निर्णय नियोजन विभाग क्र.रोहयो २००७/प्र.क्र.१७९/रोहयो-१, दि.६/१२/२००८**

**<u>प्रस्तावना:</u>**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत अनूसचित जाती / अनुसूचित जमाती / अल्प भूधारक / इंदिरा आवास योजना व भुसूधार योजनेचे लाभार्थी यांच्या शेत जमिनीवर सिंचन सुविधा पुरविणे अंतर्गत विहिरींच्या बांधकामाचे आर्थिक व तांत्रिक मापदंड संदर्भांकित शासन निर्णय दिनांक ६ डिसेंबर, २००८ अन्वये निश्चित करण्यात आले आहेत. तथापि राज्य रोहयो अंतर्गत राबविण्यात येणा-या वैयक्तिक लाभाच्या जवाहर विहीर प्रतिपुर्ती योजनेचे मापदंड व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत विहीरींचे मापदंड भिन्न असल्याने फक्त महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत विहीरींचे मापदंड सुधारित करणे व योजनेबाबत सविस्तर सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या परिशिष्ट - १ मध्ये या योजने अंतर्गत घ्यावयाच्या कामांची यादी देण्यात आली आहे. या परिशिष्टाच्या कलम १(४) अन्वये १) अनुसूचित जाती, २) अनुसूचित जमाती, ३) दारिद्रय रेषेखालील व्यक्ती, ४) इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी, ५) भूसधार योजनेचे लाभार्थी व ६) अल्प भूधारक आणि सिमांत शेतकरी या वर्गातील लाभार्थ्यांना खालील वैयक्तिक लाभार्थी योजनेचा लाभ देता येतो.

१) लघु पाटबंधारे,
२) फलोत्पादन कार्यक्रम,
३) भूसुधार व भूविकास कार्यक्रम.

२. वरीलप्रमाणे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तिक लाभार्थी योजनेत विहिरींची कामे घेता येतात. तथापि या योजने संदर्भात अद्याप स्पष्ट मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या नाहीत. मात्र काही जिल्हे जसे औरंगाबाद, नांदेड, गडचिरोली, गोंदिया व अमरावती या जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय

ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत विहिरींची कामे घेण्यात आली असून, ती यशस्वीपणे पूर्ण करण्यात आली आहेत.

३. आता मग्रारोहयो अंतर्गत विहिरीची कामे घेण्याबाबत एकत्रितरित्या सुधारित मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

**१) लाभार्थ्यांची निवड करणे.**

अ) लाभार्थ्यांची निवड ग्रामपंचायतीने करावी व त्यास गट विकास अधिका-यांची सहमती असावी. ग्रामपंचायत व गट विकास अधिकारी यांनी सदर लाभार्थी वरील परिच्छेद-१ प्रमाणे प्रवर्गातील असल्याबाबत खात्री करावी.

ब) लाभार्थ्यांची संख्या जास्त असल्यास व एकाच वेळी एका वर्षात सर्व लाभार्थ्यांना लाभ देणे शक्य नसल्यास खालीलप्रमाणे प्राथम्यक्रम ठरवावा.

१) दारिद्रय रेषेखालील अनुसूचित जमाती / अनुसूचित जातीच्या व्यक्ति,
२) अनुसूचित जमाती / अनुसूचित जाती,
३) दारिद्रयरेषेखालील कोणत्याही प्रवर्गातील व्यक्ति,
४) अल्पभूधारक व सिमांत शेतकरी,
५) भूसुधारणांचे लाभधारक

**२. विहिरीच्या खर्चाचे मापदंड**

शासन निर्णय क्रमांक : रोहयो -७/प्रक्र १७९/रोहयो-१, दिनांक ६ डिसेंबर, २००८ अन्वये निश्चित केलेले मापदंड जवाहर विहिर योजनेनुसार ठरविण्यात आले होते. तथापि विभागांतर्गत तांत्रिक समितीच्या व वित्त विभागाच्या मान्यतेने खालीलप्रमाणे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत विहिरींच्या कामांचे आर्थिक व तांत्रिक मापदंड निश्चित करण्यात आले आहेत.

| अ.क्र. | भूस्तराचा प्रकार | जिल्हे | आकारमान | सुधारित किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | १) वालुकामय व मेटामॉर्फीक (रुपांतरित) विदर्भातील भाग आणि तापी पूर्णा खो-यातील भाग | गडचिरोली, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, नागपूर, अकोला, वाशिम, अमरावती, बुलढाणा, धुळे, नंदुरबार, जळगाव, कोल्हापूर, सिंधुदुर्ग व रत्नागिरी | व्यास x खोली ४ मी. x १८ मी. | रु.१,९०००० |
| २ | २) दख्खन पठार प्रदेश | नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशिम, बुलढाणा, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, अहमदनगर, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, उस्मानाबाद, औरंगाबाद, लातूर, जालना, परभणी, हिंगोली, बीड व नादेड | ४.५० मी. x १५ मी. | रु.१,९०,००० |
| ३ | ३) जांभ्या खडकाचा प्रदेश (किनारपट्टीचा भाग) | ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग | ४ मी. x १५ मी. | रु.१,४०,००० |

मग्रारोहयो अंतर्गत बांधण्यात येणा-या विहिरीचे मापदंड आता जवाहर विहिरीच्या मापदंडापासून वेगळे करण्यात येत असून, हे मापदंड विहिर बांधकामासाठी प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चाच्या अंदाजपत्रकावर आधारित करण्यात येत आहेत. तथापि उपरोक्त सर्व प्रकारच्या विहिरींच्या बांधकामाची कमाल मर्यादा रु. २.०० लाख निश्चित करण्यात येत आहे.

## ३. विभागीय आयुक्तांच्या स्तरावरील समिती

वरिल क्र. २ प्रमाणे भुस्तर प्रकार निहाय विहीरींचे मापदंड निश्चित केले असले तरी महाराष्ट्र हे मोठे राज्य असून, प्रत्येक भागाची स्थानिक / भौगोलिक स्थिती भिन्न आहे. तेव्हा संपूर्ण राज्यभरासाठी एक ठराविक अंदाजपत्रक / विहिरींचे आकारमान निश्चित करणे शक्य नाही. तेव्हा खालील नमूद समितीने त्यांच्या विभागांतर्गत विहिरीचे तांत्रिक मापदंड ठरवावे व आवश्यक त्या तांत्रिक सूचना निर्गमित कराव्यात.

| | | |
|---|---|---|
| १) विभागीय आयुक्त, | --- | अध्यक्ष |
| २) विभागीय सहसंचालक (भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा ) , | --- | सदस्य |
| ३) अधिक्षक अभियंता, स्थानिक स्तर, | --- | सदस्य |
| ४) उपायुक्त, रोहयो, | --- | सदस्य |
| ५) विशेष कार्य अधिकारी (रोहयो) | --- | सदस्य सचिव, |

उपरोक्त समितीच्या सहमतीने मग्रारोहयो अंतर्गत तांत्रिक सूचना विभागीय आयुक्त कार्यालयाने निर्गमित कराव्या. तथापी विहिरींचे आर्थिक मापदंड रु. २.०० लाखच्या मर्यादेत असणे आवश्यक आहे.

## ४. भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेचे प्रमाणपत्र आवश्यक.

मग्रारोहयो अंतर्गत विहिरींना मंजूरी देताना भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेकडून त्याच्या निकषाप्रमाणे पाण्याच्या उपलब्धतेबाबत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

## ५. जवाहर विहिर व मग्रारोहयो अंतर्गत विहिरी मधील फरक

जवाहर विहिर ही वैयक्तिक लाभार्थी प्रतिपूर्ती योजना असून, सदर योजना राज्याच्या निधीमधून राबविण्यात येते. याबाबतच्या लाभार्थी निवडीच्या मार्गदर्शक सूचना शासन निर्णय क्रमांक : जविका २०००/प्र.क्र.१६६/रोहयो-५, दिनांक ११ ऑगस्ट, २००८ अन्वये देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार २० % लाभार्थी मागासवर्गीय अल्पभूधारक (५ एकर पर्यंत जमिनधारक ), ४० % लाभार्थी अमागासवर्गीय अल्पभूधारक ( ५ एकर पर्यंत जमिनधारक ) व ४०% लाभार्थी नाबार्डच्या व्याख्येनुसार पावसाच्या पाण्यावरील शेतीवर अवलंबून असलेले कोरडवाहू अल्पभूधरक शेतकरी यांच्यामधून निवड करावयाची आहे. या योजने अंतर्गत जॉबकार्डची आवश्यकता नसून लाभार्थ्याला थेट अनुदान दिले जाते.

## ६. मग्रारोहयो अंतर्गत विहिरी देताना खालील गोष्टी अनिवार्य आहेत.

१) ग्राम पंचायत / ग्राम सभा यांचा लाभार्थ्यांच्या निवडीबाबतचा ठराव व शिफारस,
२) प्रत्येक विहिर ही स्वतंत्र काम समजण्यात यावे.
३) सर्व प्रकारच्या अकुशल कामासाठी जॉबकार्ड आवश्यक आहे.

४) ज्या लाभार्थ्याला विहिरीचा लाभ देण्यात येणार आहे तो जॉबकार्डधारक असला पाहिजे. तसेच त्याने मजूर म्हणून काम करुन मजूरी घेणे आवश्यक आहे.

५) मग्रारोहयोच्या मार्गदर्शक सूचनानुसार हजेरीपत्रक ठेवणे, बँक किंवा पोस्टामार्फत मजूरीचे प्रदान करणे, इत्यादी कार्यपध्दतीचा अवलंब झाला पाहिजे.

६) या योजने अंतर्गत कंत्राटदार / ठेकेदार यांना बंदी राहील.

७) मग्रारोहयो अंतर्गत विहिरीची कामे करतांना कुशल भागाचे काम करण्यासंदर्भात दिनांक १५.१०.२०१० च्या शासन निर्णयाप्रमाणे अकुशल व कुशल कामाचे ६०:४० हे प्रमाण कामाच्या वार्षिक एकत्रित प्रमाणानुसार ठेवणे आवश्यक आहे. तसेच विहिरीसाठी साधनसामुग्रीचा खर्च मोठया प्रमाणात होणार असल्याने ६०:४० हे प्रमाण राखणे शक्य होणार नाही. तेव्हा विहिरींच्या कामासोबत अकुशल प्रमाण मोठया स्वरुपात असलेली कामे घेण्यात यावीत. जेणेकरुन जिल्ह्यात एकत्रितरित्या ६०:४० प्रमाण राखणे शक्य होईल. याप्रमाणे नियोजन जिल्हाधिकारी यांनी करावयाचे आहे.

८) विहिरींची कुशल व अर्धकुशल कामे करणारे विशिष्ट प्रवर्गातील समुह असतात. असा समुह स्थानिक असण्याची आवश्यकता नाही. तथापि अकुशल मजुर मात्र स्थानिक असावा.

९) अकुशल मजुरांना हजेरीपत्रकाद्वारे मजुरी प्रदान करणे अनिवार्य राहील व अर्धकुशल / कुशल मजुरांना पावतीद्वारे (Voucher) प्रदान करण्यास हरकत नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,



**(व्ही. गिरीराज )**
**प्रधान सचिव (रोहयो)**

प्रती,

सचिव, (ग्राम विकास) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
आयुक्त, कृषी, पुणे,
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे,
मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे,
सर्व उप सचिव /अवर सचिव /कक्ष अधिकारी (मग्रारोहयो), नियोजन विभाग,मंत्रालय, मुंबई ३२,
निवडनस्ती, कार्यासन रोहयो-१०-अ, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.